नाशिक जिल्हा परिषद नाशिक सामान्य प्रशासन विभाग, दुरध्वनी क्रमांक ०२५३-२५९१०१०

जाक्र/साप्रवि/आस्था-६/ ३२५ /२०१७ नाशिक दिनांक:- २४ /०७/२०१७

## परिपत्रक

**विषय :- शासकिय/निमशासकिय कार्यालयासह सार्वजनिक ठिकाणी थुंकणे/धुम्रपान करणे असे कृत्य करून कलमाचे उल्लंघन झाल्यास दंडात्मक कार्यवाही करणे बाबत.**

संदर्भ :- १) केंद्र शासनाच्या सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण) कायदा २००३.
२) सार्वजनिक आरोग्य विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक तंबाखू २०१४/प्र.क्र.१५९/आरोग्य-५, दिनांक :- १६ जुलै, २०१४

उपरोक्त केंद्र शासनाचे कायदा २००३ च्या तरतुदीत व शासनाचे आरोग्य विभागाचे शासन परिपत्रकातील तरतुदीचे अनुषंगाने सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध आहे. लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट, सुगंधित तंबाखू,स्वादिष्ट, सुगंधित सुपारी यांची निर्मिती, साठवण, वितरण किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर आणि थुंकण्यावर, वरील अधिनियमान्वये प्रतिबंध असला तरी, सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याचे आणि धुम्रपान करण्याचे प्रमाण कमी झालेचे दिसत नाही. थुंकण्यामुळे सार्वजनिक मालमत्ता विद्रुप होते. तसेच नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. उपरोक्त **अधिनियमातील कलम २१ तरतुदीनुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्यां व्यक्तीस रू. २००/- प्रमाणे दंडात्मक कार्यवाहीची तरतूद आहे.**

वरील अधिनियमातील व शासन परिपत्रकातील तरतुदीचे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने नाशिक जिल्हा परिषद मुख्यालय/कार्यालय सर्व पंचायत समिती कार्यालये व अधिनस्त असलेले विभाग या ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध असुन या कायदयातील तरतूदीचे उल्लंघन करणाऱ्यां कोणत्याही कर्मचारी/व्यक्तीवर दंडात्मक कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.हे परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे. तसेच **प्रत्येक कार्यालयाचे दर्शनी भागात सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर व धुम्रपानावर प्रतिबंध आहे. उल्लंघन केल्यास रू. २००/- ची दंडात्मक कार्यवाही केली जाईल असे नोटीस बोर्ड लावण्यात यावे.**

यापुढे वरील अधिनियमातील तरतूदीचे व परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबधीता विरूध्द कलमातील तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही संबंधीत विभागाचे कार्यालय प्रमुख/खाते प्रमुख यांनी करावी.

Deepak 24/07

**(दीपक कुमार मीना)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,नाशिक**

प्रति,

१) खाते प्रमुख-----------(सर्व) जि.प.नाशिक

२) गट विकास अधिकारी पंचायत समिती--------------(सर्व)

प्रत :-१)मा.ना.अध्यक्षा, जिल्हा परिषद नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर.

२)मा.उपाध्यक्ष/विषय समिती सभापती (सर्व) जिल्हा परिषद नाशिक यांना माहितीस्तव सविनय सादर

३)मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना माहितीस्तव